# मुंबई विद्यापीठ

क्र. टीएएस(युटी/सीटी)/ ७ /२०१७—२०१८

<u>परिपत्रक</u> :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानित, महाविद्यालयांचे प्राचार्य आणि मुंबई विद्यापीठातील विविध विभागांचे विभागप्रमुख, सर जे.जे. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, सबसेंन्टर रत्नागिरी, ठाणे सबकॅम्पस ॲन्ड डायरेक्टर, क्नॉलेज रिसोर्स सेंन्टर यांना कळविण्यात येते की, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — १, यांनी पाठविलेल्या पत्र क्र. उशिसं / २०१७/ आश्वासन—७८,७९,८०/संकीर्ण/विशी—१/१४१४३ दिनांक ०८/१२/२०१७ नुसार हिंवाळी अधिवेशन २०१७ मधील विधानपरिषद आश्वासनानुसार विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये व मुंबई विद्यापीठातील विभागांमध्ये किती तासिका तत्वावर शिक्षक नियुक्त करण्यात आलेले आहेत याबाबतची माहिती तात्काळ देणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत. यास्तव, सदर माहिती खालील नमूद केलेल्या तक्त्यात विभागाच्या ईमेल आयडीवर तात्काळ **excel** मध्येच सादर करावी.

ईमेल आयडी :— **concolsection@gmail.com**

सदर माहिती विद्यापीठास तात्काळ न पाठविल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची व विद्यापीठाचे विभागप्रमुख यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. सदर माहिती अधिवेशनात सादर करावयाची असल्याने त्याचे गांभीर्य जाणून त्यास प्रथम प्राधान्य देऊन त्वरेने कार्यवाही करावी ही विनंती.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव/ विद्यापीठ विभागाचे नाव | सन २०१७—२०१८ मध्ये तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांची संख्या |
|---|---|---|
| | | |

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— ११ डिसेंबर, २०१७

(डॉ. दिनेश कांबळे)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी आणि अध्यापक, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव आणि मुंबई विद्यापीठाचे विभागप्रमुख यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. डॉ. मोहन खताळ, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — १.
२. श्रीमती खवणेकर, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई — ३२.
३. मा. सह संचालक, महापालिका मार्ग, मुंबई विभाग, मुंबई — ४०० ००१.
४. मा. विभागीय सहसंचालक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.
५. मा. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, प्रभारी कुलसचिव, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
८. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई — ४०० ०९८.
९. जनसंपर्क अधिकारी, मुंबई विद्यापीठ, मुंबई — ४०० ०३२.

(डॉ. दिनेश कांबळे)
प्रभारी कुलसचिव